Vol 6 Issue 5 June 2016 ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**


Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

# सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पीकाच्या उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास

टी.व्ही.मुंडे
के.के.एम महाविद्यालय, मानवत , ता.मानवत जि.परभणी.

Co - Author Details :

एस.एस.पोटभरे
सहा.प्रा. , प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर , ता.कोरेगाव, जि.सातारा.



**1.1 प्रस्तावना :**

देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण असते. वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी होत असले तरी ही अवस्था साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षेत्राची मदत मोलाची ठरते. जपानसारख्या वेगाने विकसीत झालेल्या देशातसुध्दा शेतीने विकास प्रकियेला मोठा हातभार लावला आहे. देश विकसीत झाला तरी वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची आणि विविध उद्योगाची कच्च्या मालाची गरज शेती क्षेत्रच पूर्ण करते. भारतासारख्या विकसनशिल अर्थव्यवस्थेत तर राष्ट्रीय उत्पन्न,निर्यात अन्नधान्य आणि कच्च्यामालाचा पुरवठा,रोजगार इ. अनेक क्षेत्रात शेती ची भूमिका महत्त्वाची असते.

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा शेती क्षेत्रावर अवलंबून असतो. शेती क्षेत्राची प्रगती ही विकासाची पहिली पायरी मानली जाते. आज जगात जे देश प्रगत आहेत. अशा सर्व देशाच्या प्रगतीचा इतिहास देखील हेच दर्शवितो की,प्रारंभीच्या काळात या देशानी शेती क्षेत्रावर विशेष भर दिला आहे. व यामधूनच विकासाच्या पुढील टप्प्याला सुरूवात केलेली आहे. कृषी क्षेत्राचे महत्व लक्षात घेऊनच भारतासारख्या अनेक विकसनशिल देशामध्ये कृषिविषयक प्रगती ही एक प्रमुख निती म्हणून उदयास आलेली आहे. परंतू देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नामध्ये (GDP) कृषिक्षेत्राचा हिस्सा सातत्याने कमी होत चाललेला आहे. सन 2010-11 मध्ये 14.2 टक्के तर 2013-14 मध्ये तो 13.6 टक्के इतका राहिलेला आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासाचे लक्ष्य 4 टक्के ठरविलेले असतांना प्रत्यक्षात मात्र 3.6 टक्के एवढेच साध्य करू शकलो.

कृषी व्यवसाय हा जगातील अत्यंत पुरातन व्यवसाय असून आधुनिक काळात तो व्यापक प्रमाणात केला जातो. जमिन व कृषी हा प्राचीन भारतीय संस्कृतीचा मुख्य आधार आहे. देशाच्या चिरंतर व शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीमध्ये मोठया प्रमाणावर बदल घडून आले आहेत. नवनवीन शोध ,संशोधन यांच्यामुळे शेती क्षेत्रात अनेक नविन प्रयेग सुरू झालेले आहेत. थोडक्यात भारतीय शेतीमधील पारंपारिकता कमी होऊन ती आधुनिक वनत चालली आहे. भारतीय शेतीच्या सध्याच्या बदलत्या स्वरूपामध्ये प्रामुख्याने हरितग्रहातील शेती,उती संवर्धनापासून रोपे,तुषार व ठिबक सिंचन पध्दती,सेंद्रीय शेती,विकी तंत्रात सुधारणा या घटकात प्रामुख्याने मोठे वदल घडून येत आहेत.

शेती हा एक पुरातन काळापासुन केला जाणारा व्यवसाय आहे. त्याचे स्वरूप सुरूवातीला जीवन जगण्याचा एक मार्ग असे होते. नंतरच्या काळात मात्र हळुहळु शेतीमध्ये बदल होत गेला. केवळ अन्नधान्याचे उत्पादन नाही तर अनेक व्यापरी पिकाचे उत्पादन घेतले जाऊ लागले. शेतीमधील तांत्रिक सुधारणामुळे

कृषि व्यवस्थापनाचे महत्व बरेच वाढले आहे . संकरित बियाणे, सिंचनाच्या सोयी, सुधारीत अवजारे, विविध तंत्रज्ञान व रसायनिक खते इत्यादी वापरामुळे शेतीमधील उत्पादनाच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झालेला आहे .

शेती हा एक असा व्यवसाय आहे की, त्यामध्ये जेवढे पेरले त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त उत्पन्न मिळते . परंतू जर पारंपारीक पद्धतीने शेती केल्यास उत्पादन वाढण्याऐवजी घटत जाते . भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्वाचे असले तरी इतर अनेक देशाच्या तुलनेत भारताची शेती कमी प्रगत आहे . शेतीमध्ये गुंतलेली लोकसंख्या व या क्षेत्रातून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर यांचा एकत्रित विचार केल्यास भारतीय शेतीची उत्पादकता अल्प असल्याचे दिसून येते . शेती उत्पादनासाठी लागणारे घटक व शेतीतील उत्पादन यांच्या प्रमाणाला शेतीची उत्पादकता असे म्हणतात . उत्पादन क्षमतेचा विचार करतांना शेती उत्पादनाचा संबंध घटक किंवा आदनांशी जोडला जातो . शेतीची उत्पादकता मोजण्यासाठी पुढील सुत्र वापरले जाते .

$$\text{शेतीची उत्पादकता} = \frac{\text{शेतीतील उत्पादन}}{\text{शेतजमिनीचेक्षेत्रफळ}}$$

वरील सुत्र वापरून शेतीची उत्पादकता मोजली जाते . विशिष्ट क्षेत्रफळात निघणा-या उत्पादनाला शेतीची उत्पादकता असे म्हणतात . दुस-या शब्दात असे म्हणता येईल की, उत्पादकता म्हणजे उत्पादन करण्याची क्षमता / शक्ती होय . शेतीची उत्पादकता म्हणजे एक हेक्टर जमिनीमध्ये जेवढे उत्पादन मिळते त्याला दर हेक्टरी शेतीची उत्पादकता असे म्हणतात .

### 1.2 संशोधनाची आवश्यकता :

भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे . भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्वाचे असले तरी अनेक देशाच्या तुलनेत भारताची शेती कमी प्रगत आहे . निरनिराळया पिकांची दर हेक्टरी उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते . निवडक पिकांबाबत आंतरराष्ट्रीय तुलना केली असता हे अधिक स्पष्ट होईल .

तक्ता क्र.1.1
निवडक पिकांबाबत आंतरराष्ट्रीय तुलना (सन -2010)
(दर हेक्टरीउत्पादन कि.ग्रॅ.मध्ये )

| घहु | उत्पादन | तांदूळ | उत्पादन |
|---|---|---|---|
| चीन | 3885 | इजिप्त | 9135 |
| फ्रान्स | 7449 | जपान | 6582 |
| इग्लंड | 8083 | अमेरीका | 7372 |
| भारत | 2770 | भारत | 2915 |
| ऊस | उत्पादन | भुईमूग | उत्पादन |
| इजिप्त | 110893 | अर्जेटिना | 2329 |
| कोलंबिया | 94798 | ब्राझील | 2043 |
| चीन | 66353 | चीन | 2986 |
| भारत | 68044 | भारत | 794 |

जगातील काही प्रमुख देशांशी तुलना केल्यास भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते .

भारतामध्ये काही प्रगत राज्ये सोडली उदा . पंजाब, हरीयाणा, केरळ, महाराष्ट्र तर भारतात आजही शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते . महाराष्ट्रात सातारा, सांगली व सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत समजल्या जाणा-या जिल्हयाची एकूण अन्नधान्य पिकांच्या उत्पादकतेबाबत तुलना करून पिकांच्या बावतीत काय स्थिती आहे . याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे .

### 1.3 संशोधन विषयाचे महत्व :

सातारा ,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पीकांच्या उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करताना कोणता जिल्हा अग्रेसर आहे व तेथील

शेती कशापद्धतीने केली जाते याची माहीती होईल . या संशोधनाच्या माध्यमातुन या तिन्ही जिल्हयातील एकूण अन्नधान्य पीकांची तुलनात्मकरीत्या शेती उत्पादनाची परिस्थिती काय आहे हे लक्षात येईल . या संशोधनातून शेतीमध्ये काय सुधारणा झाल्या पाहिजेत व शेतक-याने शेती करताना नेमका काय बदल करावा यासाठी हे संशोधन उपयोगी ठरेल .

**1.4 संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :**

1) सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकाच्या उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे .

2) सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयात एकूण अन्नधान्य पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत याचा अभ्यास करणे .

**1.6 संशोधन पद्धती :**

या संशोधनात दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे . दुय्यम माहितीमध्ये विविध पुस्तके, मासिके,पाक्षिके , दै . वर्तमानपत्रे ,साप्ताहिके,शासकीय गॅझेटिअर,जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी अहवाल, जिल्हा कृषी विभागाचे अहवाल, कृषी आयुक्तालय,पुणे यांचा अहवाल ,महाराष्ट्र राज्य कृषी पाहणी अहवाल यांचा वापर केला आहे . तसेच या संशोधनासाठी भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांच्या संकेत स्थळाचा वापर केला आहे .

**1.7 सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पीकाची उत्पादकता :**

सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पीकाखालील क्षेत्रफळ,उत्पादन व उत्पादकता किती होती हे खालील तत्त्यावरून लक्षात येई ल .

तक्ता क्र.1.2

एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रफळ,उत्पादन व उत्पादकता

(क्षेत्रफळ 00 हेक्टर मध्ये,उत्पादन 00 टनामध्ये व उत्पादकता कि.ग्र)


| जिल्हयाचे नाव | क्षेत्रफळ/उत्पादन उत्पादकता | 2001 02 | 2010 11 | वाढ प्रतिशत मध्ये |
|---|---|---|---|---|
| सातारा | क्षेत्रफळ | 4430 | 4625 | 4 .4 |
| | उत्पादन | 4365 | 5113 | 17 .13 |
| | उत्पादकता | 985 | 1106 | 12 .28 |
| सांगली | क्षेत्रफळ | 4484 | 5414 | 20 .75 |
| | उत्पादन | 3278 | 6049 | 84 .53 |
| | उत्पादकता | 731 | 1117 | 52 .80 |
| सोलापूर | क्षेत्रफळ | 8563 | 9240 | 7 .90 |
| | उत्पादन | 4336 | 7046 | 62 .50 |
| | उत्पादकता | 506 | 763 | 50 .79 |

आधार : कृषी आयुक्तालय,पुणे


वरील तक्त्यामध्ये सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकांचे क्षेत्रफळ,उत्पादन व उत्पादकता अभ्यासकालावधीत कसे राहीले हे

स्पष्ट केले आहे . सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकांच्या क्षेत्रफळामध्ये अनुकमे 4 .4,20 .75 व 7 .90 प्रतिशत ने वाढ घडून आली . याचाच अर्थ सर्वाधीक वाढ ही सांगली जिल्हयाची 20 .75 प्रतिशत इतकी होती . तर सर्वात कमी वाढ सातारा जिल्हयात केवळ 4 .4 प्रतिशत होती . उत्पादकेचा विचार करता 2011 मध्ये सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता अनुकमे 1106कि . ग्र . ,1117 कि . ग्र . व 763 कि . ग्र . इतकी होती . म्हणजेच सर्वाधीक उत्पादकता सांगली जिल्हयाचीच होती . याचाच अर्थ सांगली जिल्हयात एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रफळ वाढण्यासाठी उत्पादकता हा घटक कारणीभूत राहीला आहे .

2001 नुसार सातारा,सांगली व सोलापूर जिल्यातील एकूण अन्नधान्य पीकांची उत्पादकता
(उत्पादकता कि . ग्र )




2011 नुसार सातारा,सांगली व सोलापुर जिल्यातील अन्नधान्य पीकांची उत्पादकता
(उत्पादकता कि . ग्र )




वरील आलेखामध्ये 2001 मध्ये एकूण अन्नधान्य पिकांची सर्वाधीक उत्पादकता सातारा जिल्हयाची होती . तर 2011 मध्ये एकूण अन्नधान्य पिकांची सर्वा धीक उत्पादकता सांगली जिल्हयाची होती .

तक्ता क्र.1.3
एकूण अन्नधान्य पिकाचा अभिवृध्दी दर

| वर्ष 2001 ते 2011 | क्षेत्रफळ/उत्पादन उत्पादकता | समांतर माध्य (Mean) | प्रमाण विचलन (S.D.) | प्रमाण विचरण गुणांक (C.V.) | रेषीय अभिवृध्दी दर (LGR) | संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) |
|---|---|---|---|---|---|---|
| सातारा | क्षेत्रफळ | 4419.90 | 579.03 | 13.10 | 0.53 (0.123) | 0.72 (0.147) |
| | उत्पादन | 4441.40 | 718.76 | 16.18 | 2.59 (0.485) | 2.81 (0.489) |
| | उत्पादकता | 1009.40 | 132.62 | 13.14 | 2.05 (0.474) | 2.08 (0.464) |
| सांगली | क्षेत्रफळ | 4529.80 | 800.89 | 17.68 | 1.91 (0.328) | 1.97 (0.301) |
| | उत्पादन | 3737.10 | 1347.51 | 36.05 | 7.25 * (0.609) | 8.24 * (0.592) |
| | उत्पादकता | 806.00 | 192.47 | 23.87 | 5.63 ** (0.715) | 6.15 ** (0.706) |
| सोलापूर | क्षेत्रफळ | 7978.90 | 1935.06 | 24.25 | 2.36 (0.295) | 3.10 (0.254) |
| | उत्पादन | 4911.10 | 1829.70 | 37.25 | 9.23 *** (0.751) | 13.33 (0.525) |
| | उत्पादकता | 562.90 | 202.65 | 36.02 | 8.79 ** (0.739) | 12.28 (0.532) |

कंसातील आकडे 'r' मूल्य दर्शवितात. ***- सांख्यकीच्या एक प्रतिशत पातळीला महत्त्वपूर्ण **-सांख्यकीच्या एक प्रतिशत पातळीला महत्त्वपूर्ण *- सांख्यकीच्या एक प्रतिशत पातळीला महत्त्वपूर्ण

वरील तक्त्यामध्ये एकूण अन्नधान्य पिकाचा अभिवृध्दी दर दर्शविला आहे. एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रफळामध्ये अभ्यासकालावधीत सातारा,सांगली व सोलापुर जिल्हयात वार्षिक अनुकमे 0.72,1.97 व 3.10 या प्रतिशत दराने धनात्मक वाढ घडून आली. पण ही वाढ सांख्यकीय पातळीला महत्वपूर्ण असल्याचे दिसून येत नाही. मात्र उत्पादकतेच्या बाबतीत अभ्यासकालावधीत केवळ सांगली जिल्हयात 6.15 या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ सांख्यकीच्या पाच प्रतिशत या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

### 1.8 प्रमुख निष्कर्ष :

1. एकूण अन्नधान्य पिकाच्या क्षेत्रफळात सर्वाधीक वाढ सांगली जिल्हयात 20.75 प्रतिशत होती. तर सर्वात कमी वाढ सातारा जिल्हयाची केवळ 4.4 प्रतिशत होती.

2. 2001 नुसार एकूण अन्नधान्य पिकाची उत्पादकता सर्वात जास्त सातारा जिल्हयाची 985 कि.ग्र. इतकी होती. तर सर्वात कमी सोलापूर जिल्हयाची 503 कि.ग्र. होती.

3. 2011 नुसार एकूण अन्नधान्य पिकाची उत्पादकता सर्वात जास्त सांगली जिल्हयाची 1117 कि.ग्र. इतकी होती. तर सर्वात कमी सोलापूर जिल्हयाची 763 कि.ग्र. होती.

4. अभ्यासकालावधीत एकूण अन्नधान्य पिकाचे सर्वाधीक उत्पादन सोलापर जिल्हयाचे होते तर सर्वात कमी उत्पादन सातारा जिल्हयाचे होते.

5. उत्पादकतेच्या बाबतीत अभ्यासकालावधीत केवळ सांगली जिल्हयात 6.15 या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ सांख्यकीच्या पाच प्रतिशत या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**1.9 सातारा ,सांगली व सोलापूर जिल्हयात अन्नधान्य पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना :**

**1**. सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयात तुलनेने सोलापुर जिल्हयाची उत्पादकता सर्वात कमी आहे . ती वाढविण्यासाठी शेतकयांनी योग्य व दर्जदार बियांणाचा वापर करावा . व तसेच रासायनिक खताचा वापर योग्य प्रमाणात करावा .

**2**. पाणलोट क्षेत्राचा मुख्य हेतू म्हणजे पावसाचे पाणी जास्तीत जास्त अडवून व जमिनीत मुरवुन त्याचा वापर पिकासाठी व भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी उपयोग होतो . यासाठी सरकारने विषेश कृती कार्यक्रम हाती घ्यावा .

**3**. शेतकयांनी शेतीकडे परंपरागत दृष्टीकोनातून न पाहता व्यापारी दृष्टीकोनातून पहावे . व शेती आधुनिक पध्दतीने करावी .

**4**. कृषी विपणन पध्दतीत सुधारणा करून शेतकयांना त्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी सरकारने आधार किंमती पेरणी अगोदरच जाहीर कराव्यात .

**5**. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाने कृषी हवामान लक्षात घेऊन कडधान्ये,तृणधान्ये,तेलबिया व नगदी पिकांच्या अनेक नवनविन जाती संशोधित कराव्यात व त्याची माहीती शेतकयांपर्यंत पोहचविण्यासाठी विशेष योजना आखावी .

**6**. पीक तयार झाल्यानंतर एकाच वेळी बाजारात येते . बाजारात कृषी पुरवठा अधिक झाल्याने कृषी मालाच्या किंमतीत घसरण होते . त्यामुळे शेतकयांचे मोठे नुकसान होते यासाठी सरकाराने विशेष प्रयत्न करावेत .

**7**. शेतकयांना शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, गायीपालन, म्हैसपालन, शेळीपालन, व कुक्कुट पालन इ . साठी कर्ज उपलब्ध करून द्यावे व शेतकयांनी देखील सदर कर्जाची परतफेड वेळेत करावी .

**1.9 सारांश :**

सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकांच्या क्षेत्रफळामध्ये अनुक्रमे **4 . 4,20 . 75** व **7 . 90** प्रतिशत ने वाढ घडून आली . याचाच अर्थ सर्वाधीक वाढ ही सांगली जिल्हयाची **20 . 75** प्रतिशत इतकी होती . तर सर्वात कमी वाढ सातारा जिल्हयात केवळ **4 . 4** प्रतिशत होती . उत्पादकेचा विचार करता **2011** मध्ये सातारा,सांगली व सोलापूर जिल्हयातील एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता अनुक्रमे **1106**कि . ग्र . ,**1117** कि . ग्र . व **763** कि . ग्र . इतकी होती . म्हणजेच सर्वाधीक उत्पादकता सांगली जिल्हयाचीच होती . उत्पादकतेच्या बाबतीत अभ्यासकालावधीत केवळ सांगली जिल्हयात **6 . 15** या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ सांख्यकीच्या पाच प्रतिशत या अर्थपूर्णता पातळीला महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते . याचाच अर्थ सांगली जिल्हयात एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रफळ वाढण्यासाठी उत्पादकता हा घटक कारणीभूत राहीला आहे .

**संदर्भ :**

**1**. भारतीय अर्थव्यवस्था ,दत्त ॲण्ड सुंदरम आवृती **2013**
**2**. व्यावसायिक पर्यावरण ,भोसले /काटे,फडके प्रकाशन,कोल्हापूर
**3**. भारतीय अर्थशास्त्र,डॉ . जी . एन . झामरे,पिंपळापुरे ॲण्ड कं . पब्लिशर्स
**4**. डॉ . प्रभाकर देशमुख- श्रमाचे अर्थशास्त्र- विद्या प्रकाशन, नागपूर तृतीय आवृती
**5**. आर्थिक व सामाजिक समालोचन, सातारा जिल्हा वर्ष **2001** ते **2011**
**6**. आर्थिक व सामाजिक समालोचन, सांगली जिल्हा वर्ष **2001** ते **2011**
**7**. आर्थिक व सामाजिक समालोचन सोलापूर जिल्हा वर्ष **2001** ते **2011**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org